"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे"

महाराष्ट्र शासन

## उप वनसंरक्षक, अलिबाग यांचे कार्यालय, अलिबाग

मु.पो.हिराकोट तलावाजवळ अलिबाग ता.अलिबाग जि.रायगड पी.नं. 402 201
दूरध्वनी क्र 02141-222016/222216 Email ID:dycfalibag@mahaforest.gov.in

जावक क्रमांक: ब/20/जमिन/व.सं./ [illegible] /2022-23. दिनांक: 19/10/2022

प्रति,

मुख्य व्यस्थापक (तांत्रीक) व प्रकल्प संचालक,
राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पीआयु-पनवेल, सर्व्हे नंबर 63,
एनएच-4बी, डी-पाईंट, चिंचपाडा-कळंबोली बायपास रोड,
पनवेल - 410 206.

विषयः- <u>वन जमिन रायगड.</u>
राष्ट्रीय महामार्ग क्र. 4बी व 348 (जुना रा. मा. क्र. 54 व आमरा मार्ग)
मधील पुरवणी 1.036 हे. वनजमिन मागणी प्रस्ताव.......
भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण.

संदर्भः- 1) केंद्रशासनाकडील पत्र क्र. एफसी-I/एमएच-282/2022-एनजीपी/10151, दिनांक 13/08/2022. (दिनांक 02/9/2022 रोजी प्राप्त)
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. ब/20/जमिन/1963, दिनांक 06/09/2022.
3) आपलेकडील पत्र क्रमांक एनएचएआय/एमजेपीआरसीएल/पीआययु/पनेवल/2022-23/896, दिनांक 12/10/2022.

उपरोक्त संदर्भिय पत्र अन्वये राष्ट्रीय महामार्ग क्र. 4बी व 348 (जुना रा. मा. क्र. 54 व आमरा मार्ग) मधील पुरवणी 1.036 हे. वनजमिन मागणी प्रस्तावात 1 ते 7 त्रुटी उपस्थित करणेंत आल्या आहेत. याबाबत पूर्तता करणेकरीता आपणास या कार्यालयाकडील संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये विनंती करण्यात आलेली होती. त्यानुसार आपणाकडुन संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये त्रुटी पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करणेत आलेला आहे.

सदर अहवालाची छाननी केली असता त्यामध्ये अद्याप खालील मुद्यांची पूर्तता झलेली नाही.

1) केंद्रशासनाने उपस्थित केलेला मुद्दा क्रमांक 1 नुसार फार्म- अ भाग-१ ची हार्ड कॉपी सादर करणेबाबत सूचित केलेले आहे. तथापी आणाकडून ऑनलाईन फार्म-अ भाग-१ ची प्रिंट काढून सादर केली आहे. वास्तविक पहाता केंद्रशासनाने विहित केलेल्या ऑफलाईन फार्म-अ

भाग-१ मध्ये सविस्तर माहिती भरुन सादर करणे अपेक्षीत आहे. तरी त्यानुसार पूर्तता होणेस विनंती आहे.

2) प्रस्तावांत यापूर्वी सादर करणेत आलेलाच वनभंग अहवाल पुनःश्च पूर्तता अहवालासोबत जोडून पाठविणेत आलेला आहे. तथापी केंद्रशासनाने उपस्थित केलेल्या त्रुटीनुसार आपणाकडून पूर्तता करणेत आलेली नाही. सदर वनभंग अहवालांत मुद्दा क्र. १३ वर वनभंगास जबाबदार असणा-यां विरुध्द केलेली कारवाईबाबत आपण -Not required असे नमुद केलेले आहे. तरी सदर वनभंग अहवालांत वनभंगास जबाबदार असणा-यां विरुध्द कारवाईची आवश्यकता का नाही याबाबत तर्कशुध्द सविस्तर स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे. तरी त्यानुसार सुधारीत अहवाल तयार करुन तो या कार्यालयास सादर करावा.

3) तसेच केंद्रशासनाकडील मुद्दा क्र. 7 नुसार आपण पूर्तता अहवालात निर्माण होणारे मनुष्य दिवस याबाबत माहिती दिलेली आहे. तरी सदर माहिती प्रस्तावांत सामील करणेचे दृष्टीने वेगळया पानावर नमुद करुन त्यावर स्वाक्षरी करुन दिल्यास ती सादर करणे सोईचे होईल.

तरी वरील प्रमाणे मुद्यांबाबत परिपूर्ण पूर्तता होऊन सदर पूर्तता अहवालाचे 5 संच उपलब्ध करुन देणेस विनंती आहे. जेणेकरुन या कार्यालयाकडून पूर्तता करावयाचे मुद्याबाबत माहिती देऊन संकलीत पूर्तता अहवाल वरीष्ठांमार्फत केंद्रशासनास सादर करणे शक्य होईल.

(आशिष ठाकरे, भा.व.से.)
उप वनसंरक्षक,
अलिबाग.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

प्रतिलिपी:- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक, ठाणे यांचेकडे माहितीसाठी सादर.

प्रतः- सहाय्यक वनसंरक्षक, पनवेल व वन परिक्षेत्र अधिकारी, उरण यांचेकडे संदर्भिय पत्राचे प्रतीसह माहिती व जरुरत्या कार्यवाहीसाठी रवाना.

2/- परिक्षेत्र अधिकारी, उरण यांनी सदर प्रकल्पांत पर्यायी वनीकरणाकरीता मौजे सारडे ता. उरण येथील कंपार्टमेंट नंबर 139E मधील 2.08 हेक्टर क्षेत्र सुचविण्यात आलेले आहे. त्यानुसार पर्यायी वनीकरणाची योजना देखील सादर करणेत आलेली होती. तथापी केंद्रशासनाने संदर्भिय पत्रान्वये उपस्थित केलेले मुद्यानुसार पर्यायी वनीकरण योजनेत कुंपणाचा खर्च दर्शवून सुधारीत पर्यायी वनीकणाची योजना दोन दिवसांत या कार्यालयांत 6 प्रतीत सादर करावी.

3/- तसेच उक्त प्रस्तावांत झालेल्या वनभंगाबाबत वनपरिक्षेत्र यांनी केलेल्या कार्यवाहीबाबत अहवाल देखील त्यांचे अहवालासमवेत सादर करावा.